कार्यालय,
दुय्यम निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,
सातारा जि. सातारा
****************************

जा.क्र. आरएस ११२०२४/ 21 /दु.नि.
सातारा दि.0८/०४/२०२४.

प्रति,

मा.अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क,
सातारा

विषय :- प्राचार्य, सावकार कॉलेज ऑफ होमिओपॅथिक, देगाव ता. जि. सातारा नवीन आरएस-२ मिळनेबाबत विनंती अर्ज बाबत...

संदर्भ :- आपले कार्यालयीन पत्र क्र. आरटीएस ११२०२४/१०४१/४५३/व.लि. सातारा दि. १०/०४/२०२४.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन अहवाल सादर करणेत येतो की, आपले कार्यालयाचे संदर्भीय पृष्ठांकाना सोबत प्राचार्य, सावकार कॉलेज ऑफ होमिओपॅथिक, ए/एम,१/१एमआयडीसी देगाव ता. जि. सातारा येथे नवीन आरएस-२ अनुज्ञप्ती मिळणेकरीता केलेला प्रस्ताव आपले कार्यालयाकडे विनंती अर्ज सादर केला असून उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये चौकशी साठी देण्यात आला आला असून त्या अनुशंगाने चौकशी करून अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

अर्जासोबत व चौकशी दरम्यान प्राचार्य, सावकार कॉलेज ऑफ होमिओपॅथिक, देगाव ता. जि. सातारा यांचा जबाब अभिलेख केलेला असून त्यांच्या स्वाक्षरीनेच दिनांक १६.०३.२०२३ रोजी अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सातारा या कार्यालयास महाविदयालयातील शिक्षण घेत असणा-या विदयार्थांना शिक्षणासाठी अल्कोहोल चा वापर करण्याकरीता आरएस-२ नवीन अनुज्ञप्ती मिळणेकामी अर्ज केला असून तो त्यांनीच केला आहे. त्याअनंशंगाने प्रस्तावीत जागेस भेट देउन तपासणी केली असता इमारीत ही पुर्ण पणे आरसीसी बांधकाम असून नियोजीत जागा हि ६.१८ स्केअर फूट ची असून पुर्ण पणे बंदीस्त आहे. त्यास आवश्यक असणारे खालील कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे

१. विहीत नमुन्यातील रू ५/- कोर्ट फी स्टॅम्प लावलेला दिनांक. १६.०३.२०२३ चा अर्ज.
२. प्राचार्य समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे सावकार होमिओपॅथिक वैदयकीय महाविदयालय सातारा यांचे अल्कोहोलचा दुरूपयोग होणार नसल्याचे प्रमाणपत्र.
३. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठ, नाशिक यांचे शैक्षणिक अधिसुचना क्रं ४१/२०१५ ची सुधारीत अभ्यासक्रम लागू केल्याचे पत्राची छा. प्रत.
४. केंद्रीय कॉन्सील ऑफ होमिओपॅथिक अभ्यासक्रम लागू केल्याचे पत्राची छा. प्रत.
५. केंद्रीय कॉन्सील ऑफ होमिओपॅथिक आयोग यांचे मेडीकल कॉलेज मंजूरी दिल्याबाबतचे दिनांक १५.०११.२०२२ चे पत्राची छा. प्रत.
६. केंद्रीय कॉन्सील ऑफ होमिओपॅथिक आयोग यांचे विद्यार्थी वाढीवचे शुध्दीपत्रक दिल्याबाबतचे दिनांक १६.०११.२०२२ चे पत्राची छा. प्रत.

७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान नाशिक यांचे सातत्य पदाबाबतचे दिनांक ३०.११.२०२२ चे पत्राची छा. प्रत.
८. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सांगली यांचे समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे नोंदणीचे प्रमाणपत्राची छा. प्रत.
९. ग्रामपंचायत कोडोली यांचे समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे नावे व्यवसाय करण्यास नाहरकत दाखल्याची छा. प्रत.
१०.प्राचार्य समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे सावकार होमिओपॅथिक वैदयकीय महाविदयालय सातारा यांचे प्रति विद्यार्थी ६०० मि ली असे एकुण ६० लिटर अल्कोहोल शैक्षणिक वापराबाबतचे प्रमाणपत्र.
११. महाराष्ट्र शासनाचे होमिओपॅथिक वैदयकीय महाविदयालय यांचे प्रवेश क्षमतेबाबत दिनांक २९.०६.२००१ चे शासन निर्णयाचे छा. प्रत.
१२.एम.आय.डी.सी. सातारा यांचे बांधकाम पुर्णत्वाचे दिनांक ०४.०४.०२०१९ चे छा. प्रत.
१३.एम.आय.डी.सी. सातारा व समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे सावकार होमिओपॅथिक वैदयकीय महाविदयालय सातारा यांच्यात रजिस्टर भाडेकराराची छा. प्रत.
१४. समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे संचालक मंडाळाची यादी
१५. अग्निशामक विभागाचे दिनांक २६.०४.२०२३ अखेर नुतणीकरण बाबतचे पत्राची छा. प्रत.
१६. नकाशची ४ प्रती.
१७. डॉ. मनिष इनामदार प्राचार्य समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे सावकार होमिओपॅथिक वैदयकीय महाविदयालय सातारा यांचा जबाब.

मा. अधीक्षक सो. यांना केलेल्या विनंतीनुसार आरएस-2 अनुज्ञप्ती मंजूर झाल्यास ते मुंबई दारूबंदी कायदा १९४९ व मुंबई रेक्टीफाईड स्पिरीट नियमावली १९५१ चे सर्व नियम, अटी, शर्ती व वेळोवेळी झालेले आदेश यांचे पालन करण्यास तयार आहे तसेच भविष्यात लागणरी कागदपत्रे व नियमानुसार देय फी ची पुर्तता करण्यास तयार असल्याचे जबाबत नमूदकेले आहे. तसेच आवश्यक असणारे अल्कोहोल शासन नियमानुसारचे शुल्क भरून खरेदी करण्यास तयार असल्याचे त्यांच्या जबाबात लिहून दिले आहे.

सदर पप्रकरणी उपरोक्त प्रमाणे चौकशी करण्यात आली असून अर्जदार यांनी मुंबई रेक्टीफाईड स्पिरीट नियमावली १९५१ चे नियम ४ नुसार अर्ज केला असून सर्व आवष्यक बाबींची पुर्तता होत असल्याने प्रकरणी अर्जदार प्रचलित दराने अनुज्ञप्ती शुल्क भरण्यास तयार असून अॅब्सुल्युट अल्कोहोल ६० लिटर कोटयाची आरएस-२ अनुज्ञप्ती नियम ६ नुसारचा फॉर्म ए नमुन्यातील बॉन्डस स्विकारून मंजूर करण्यास हरकत वाटत नाही.

प्रकरणी चौकशी दरम्यान प्राप्त करुन घेतलेली कागदपत्रे व घेण्यात आलेले जाबजबाब व मुळप्रकरण पुढील योग्यत्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

Sneutica

08/08/2023

लिपिक
अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
... कार्यालय सातारा

(श्रीमती एस.एस. भोसले)
दुय्यम निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क
दुय्यम निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क,
सातारा जि. सातारा.